# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 478/2022 दिनांक : 12.12.2022**

## 1)घरफोडी :–

**1)कंधार :–** दिनांक 10.12.2022 रोजी 16.00 वा. ते दि. 11.12.2022 चे रात्री 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरातुन अभिनवनगर कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे घरास कुलूप कोंडी लावुन बाहेरगावी मौ. चिंचोली येथे गेला असता कोणीतरी अज्ञात चोरटयांने फिर्यादीचे घराचे कुलूप कोंडा तोडुन आत प्रवेश करून घरात असलेल्या कपाटाचे लॉक तोडुन कपाटातील सोन्या चांदीचे दागिने किंमती 60,000/–रूपयाचे अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी बळवंत पी. पांडुरंग कौशल्य, वय 35 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. चिंचोली ता. कंधार ह. मु. अभिनवनगर कंधार ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरन 379/2022 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री गणाचार्य, मो.क्रं. 9823391570** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**1)लोहा :–** दिनांक 07.12.2022 रोजी 16.45 ते दि. 07.12.2022 चे 21.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे इस्तेमा कार्यक्रम लोहा ते कंधार जाणारे रोडच्या बाजुस बाबु धाब्याजवळ ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मो सा. क्रं एमएच–26/बीजे–2085 किंमती 30,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयांने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी अब्दुल्ला जलील अहमद, वय 31 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. हैदरबाग क्रं 1 देगलुर नाका नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरन 239/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2483 साखरे, मो. क्रं. 9823015483** हे करीत आहेत.

## 3)अवैध रेती चोरी :–

**1)सोनखेड :–**दिनांक 11.12.2022 रोजी चे 00.15 ते 01.00 वा. चे दरम्यान, **पिंपरणवाडी शिवरातील जिनिंगचे बाजुस ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे त्यांचे अवैध गौण खनिज चोरीवर कार्यवाही करीता पथकासह मौ. बोरगाव जवळा देशमुख परिसरात गस्त करीत असतांना यातील आरोपीचे बिना नंबरचे हायवा टिपर बिना परवाना बेकायदेशिररीतया रेती भरून चोरटी विक्री करण्या करीता वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने सदरचे हायवा टिपर पोलीस स्टेशनला घेवुन येत असतांना यातील आरोपी क्रं 2 याने यातील हायवा मालक आरोपी क्रं 1 हा हायवा जवळ येवुन माझी हायवा पोलीस स्टेशनला लावत नाही तुम्हाला काय करायचे ते करा असे म्हणल्याने फिर्यादीने सदरचे हायवामध्ये पथकातील कर्मचारी यांना बसवुन पोलीस स्टेशनकडे येत असतांना सोनखेड पोलीस स्टेशनकडे हायवा न वळविता शेवडी कमान मधुन जिनींगचे बाजुला जावुन थांबला. सदर ठिकाणी आरोपी क्रं 1 यानी हायवातील लोखंडी रॉड हातात घेवुन फिर्यादीचे व साक्षीदाराचे अंगावर जावुन साक्षीदार यास धक्काबुक्की केली व शिवीगाळ केली. तुम्ही नौकरी कशी करता बघुन घेतो. तुम्हाला माणसे लावुन जिवे मारतो अशी सर्वांना जिवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादी व साक्षीदार हे शासकीय काम करीत असतांना शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी अशोक मारोती मोकले, वय 47 वर्षे, व्यवसाय नौकरी नायब तहसीलदार तहसील कार्यालय लोहा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं 174/2022 कलम 379, , 353, 332, 323, 504, 506, 34 भादवी सह कलम 15 भा. पर्यावरण संरक्षण कायदा 1986 सह खान व खनिजे विकास व सहनियंत्रण कायदा 1957 चे कलम 4, 21 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री परिहार, मो. क्र. 9309758181** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**हिमायतनगर :–**दिनांक 11.12.2022 रोजी 09.15 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर मौ. सिरंजनी ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद नऊ आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीच्या घरा समोर आरोपीने फिर्यादीस लाकडाने मारून मुक्का मार दिला व फिर्यादीचे पत्नीचे डोक्यात दगड मारून डोके फोडले तोंडावर लाकडाने मारून दात पाडुन गंभीर जखमी केले. तसेच भावजयीस डाव्या हातावर, पाठीवर, तोंडावर लाकडाने मारून जखमी केले. तसेच मुलगा अवधुत कौठेकर, भाऊ प्रकाश कौठेकर, पुतण्या विनोद कौठेकर यांना थापडबुक्यांनी मारहाण करून मुक्का मार दिला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी कैलास पि. चंपती कौठेकर, वय 50 वर्षे, व्यवसाय शेती रा. सिरंजनी ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरन 282/2022 कलम 326, 325, 324, 323, 143, 147, 148, 149, 504, 506, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री महाजन, मो. नं. 9834774799** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :–

**1)इतवारा :–** लग्न झाल्यानंतर सहा महिन्यापासुन ते दिनांक 03.12.2022 रोजी चे 07.00 पावेतो, **नालासोपारा जि. पालघर व फिर्यादीचे वडिलाचे घरी हैदरबाग नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस वडीलाकडुन गॅरेजसाठी तसेच घर भाडयाने राहन्यासाठी डिपॉजीट साठी वेळोवेळी पैसे घेतले तसेच गॅरजसाठी वडिलाकडुन दहा लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 34 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 339/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1821 शेख रसुल, मो.क्रं. 02462–236510** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :–** दिनांक 27.04.2022 रोजी चे 10.30 वा. लग्नाच्या दुसऱ्या दिवशी पासुन ते दिनांक 09.12.2022 रोजी चे 17.00 पावेतो, **सोमनाथे ले आऊट सिंधी मेघे, वर्धा व वैभवनगर तरोडा बु. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस तुझ्या आई वडीलाकडुन वीस लाख रूपये घेवुन ये म्हणुन उपाशी पोटी ठेवुन शिवीगाळ व थापड बुक्यांनी मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 32 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 448/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/06 हंबर्डे, मो.क्रं. 8972897411** हे करीत आहेत.

## 6)अपघात :–

**भोकर :–** दिनांक 11.12.2022 रोजी 11.15 वा. चे सुमारास, **भोकर येथील बोरगांव चोकातील रोडवर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे शांताबाई रामराव मलदोडे, वय 60 वर्षे, रा. वैजापुर पार्डी ता. मुदखेड जि. नांदेड** हीस यातील ट्रक क्रं क्र एमएच–26/बीई–9098 च्या चालकाने आपले वाहन वाहन हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन फिर्यादीच्या मो सा ला पाठीमागुन जोराची धडक देवुन पाठीमागे बसलेल्या शांताबाईचे अंगावरून ट्रक घालुन तीचे मरणास कारणीभुत झाला. फिर्यादीस गंभीर जखमी केले आहे. वगैरे **फिर्यादी राजु आनंदराव मुसळे, वय 26 वर्षे, व्यवसाय शेती रा. थेरबन ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं. 478/2022 कलम 279,337,338,304(अ) भादवी सह 134/187 मो. वा. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री अनिल कांबळे, मो.क्र. 9096254358** हे करीत आहेत.

## 7)गॅस पाईप फुटून जळुन मृत्यु :–

**हिमायतनगर :–**दिनांक 10.12.2022 रोजी 08.00 वा. चे सुमारास, **सरकारी दवाखाना विष्णुपूरी नांदेड येथे,** यातील **मयत नामे रिया पि. दिपेंद्र परिहार, वय 2 वर्षे 6 महीने रा. तरसौर ता. जि. जालोन ऊत्तरप्रदेश ह. मु. आंबेडकरचौक जिलानी सेठ यांच्या घरी हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड**, हीचे आई वडील घरी पाणीपुरी तळत असतांना अचानक दिनांक 09.12.2022 रोजी चे 12.00 वा. चे सुमारास गॅसचा पाईप फुटूल्याने गॅसचा अचानक भडका झाल्याने मयत ही गंभीररीत्या भाजल्याने तिस उपचार कामी स. दवाखाना हिमायतनगर येथे दाखल केले असता तिस प्रथम उपचार करून नांदेड येथे रेफर केले असता उपचारा दरम्यान मरण पावली आहे. वगैरे **खबर देणार पोहेकॉ/2093 एक के बयास, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे हिमायतनगर** आ. मृ. **49**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2303 सिंगनवाड, मो.नं. 9049078521** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 479 / 2022 दिनांक : 12.12.2022

पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथील गुन्हे शोध पथकाची उत्कृष्ट कामगीरी पोस्टे गंगाखेड येथील खुनाचे गुन्हयातील फरार असलेला आरोपी व सोबत एक आरोपी यांचेकडुन एक पिस्टल,दोन जिवंत काडतुस, एक खंजर,व मोटर सायकल जप्त

मा.पोलीस अधीक्षक साहेब,श्री श्रीकृष्ण कोकाटे साहेब, व मा.अपर पोलीस अधीक्षक श्री अबिनाश कुमार यांनी नांदेड शहरातील पोलीस स्टेशन प्रभारी यांना नांदेड शहरामध्ये अवैद्यरित्या अग्नीशस्त्र बाळगणारे गुन्हेगारांची माहिती घेवुन त्यांचेवर कारवाई करण्याचे आदेशीत केले.

मा. उप विभागीय पोलीस अधिकारी, श्री चंद्रसेन देशमुख, उप विभाग नांदेड शहर व पोलीस निरीक्षक श्री डॉ. नितीन काशिकर यांचे मार्गदर्शना प्रमाणे पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाने पोलीस स्टेशन हद्यीत अवैधरित्या अग्नीशस्त्र बाळगणारे गुन्हेगारांची माहिती घेवुन कार्यवाही करण्याबाबत आदेशीत केले होते.

दिनांक.१२/१२/२०२२ रोजी सकाळी ०६.३० वाजताचे सुमारास गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी हे पेट्रोलींग करीत असतांना श्रावस्तीनगर परिसरात दोन इसम पिस्टल व खंजर बाळगुन फिरत आहेत. अशी गोपनिय माहिती मिळाल्याने तात्काळ सदर ठिकाणी जावुन सापळा लावुन १.राहुल उर्फ बक्कासुर पि.नित्यानंद भगत वय २० वर्ष रा. गोविंदनगर नांदेड, ०२. सतिष गंगाधर घोरपडे वय २५ वर्ष रा.चौधरी गल्ली पालम जिल्हा परभणी यांना ताब्यात घेवुन अंगझडती घेतली असता, सतिष गंगाधर घोरपडे याचे कमरेला एक गावठी बनावट पिस्टल किंमती ४०,०००/—रूपये व मॅगझीनमध्ये दोन जिवंत काडतुस किंमती ५००/—रूपये मिळुन आले. तसेच राहुल भगत याचे कमरेला एक धारदार लोखंडी खंजर किंमती ५००/—रू व एक प्लॅटीना मो सा किंमत अंदाजे ४०,०००/—रूपये असा एकुण ८१,०००/—रूपयाचा मुद्येमाल मिळुन आल्याने दोन्ही इसमांना ताब्यात घेण्यात आले. त्यांचेकडे विना नंबर प्लेट असलेली मो सा बाबत विचारपुस केली असता राणी सावरगाव येथुन मो सा चोरल्याचे सांगीतले.

तसेच आरोपीस अधिक विचारपुस केली असता आरोपी नामे सतिष गंगाधर घोरपडे वय २५ वर्ष रा.चौधरी गल्ली पालम जिल्हा परभणी याचेवर पोलीस स्टेशन गंगाखेड जि.परभणी येथे माहे मे /२०२२ मध्ये

गु.र.न २३४/२२ कलम ३०२,३६४,१२० ब, भादंवि अन्वये गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयामध्ये अद्याप फरार असल्याने त्यांना ताब्यात घेवुन चांगली कामगीरी केली

सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक नांदेड, मा.श्री श्रीकृष्ण कोकाटे , मा.अपर पोलीस अधीक्षक श्री अबिनाश कुमार व उप विभागीय पोलीस अधिकारीमा.श्री चंद्रसेन देशमुख , पोलीस निरीक्षक डॉ.नितीन काशीकर पोलीस स्टेशन शिवाजीनगर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील स.पो.नि आर.व्ही वाहुळे, पोलीस उप निरीक्षक मिलींद सोनकांबळे, व अमलदार शेख इब्राहीम, दिलीप राठोड, रविशंकर बामणे, देविसिंग सिंगल,शेख अझहर, दत्ता वडजे, विष्णु डफडे यांनी पार पाडली.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड